नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 13/07/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

## एटीएम चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा धापेवाडा येथील बॅक ऑफ इंडीयाचे एटीएम येथे दिनांक 11/07/2020 चे 21.00 वा. ते दिनांक 12/07/2020 चे 06.30 वा. दरम्यान बॅक ऑफ इंडीया धापेवाडा येथील एटीएम मशीनच्या रुमच्या शटरचे लॉक अज्ञात आरोपीने तोडुन आत मध्ये प्रवेश केले. यानंतर आरोपीने एटीएम मशीनचा समोरील खालील भाग गॅस कटरने तोडुन मशीन मधील नगदी 10,44,500/– रु. रोख रक्कम कॅसेटसह चोरुन नेले.

सदर प्रकरणी फियादी नामे– श्रीधर भाऊरावजी केदार, वय 39 वर्षे, रा. प्लाट कं. 1, शिवनगर दुर्गा पार्क, नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सागर करांडे पो.स्टे सावनेर 7722011228 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा धापेवाडा ता.कळमेश्वर येथे दिनांक 11/07/2020 चे 21.30 वा. ते दिनांक 12/07/2020 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र विनायक मस्के, वय 27 वर्ष, रा. धापेवाडा यांची एमएच–40/बीएल– 5664 क्रमांकाची टाटा एस मालवाहु गाडी घरासमोर उभी करुन ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची किमंती 2,00,000/– रु. टाटा एस गाडी चोरुन नेली. .

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 11 कि. मी अंतरावर नवेगाव देशमुख येथे दिनांक 12/07/2020 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रभाकर तुकाराम शहाणे, वय 37 वर्ष, रा. नवेगाव देशमुख हे आपल्या शेतातुन घरी येत असता आरोपी नामे– 1) शेषराव श्यामराव भोयर, रा. नवेगाव देशमुख व 2) श्यामराव भोयर, रा. नवेगाव देशमुख यांनी संगनमत करून शेतातील घराजवळ फिर्यादींच्या वडीलांना पाहुन शिवीगाळ केली. फिर्यादींनी आरोपीतांना हटकले असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण केले. या कारणावरून आरोपीतांनी घरामध्ये जावुन एक भाला घेवुन आला व बोलता–बोलता "फिर्यादीच्या उजव्या पायावर मारले." यानंतर आरोपीतांनी फिर्यादीला काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादी व त्यांच्या वडीलांना मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 3724, 34,, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ डहाके 9823517412 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर